सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.**

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org

Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्र.विकाअ/न्या.प्र./2025/ 565 दिनांक 24 FEB 2025

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित
अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/एमबीए/एमसीए अभ्यासक्राच्या पदवी/ पदवीका संस्था,
अमरावती विभाग, अमरावती

**विषय :- मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील याचिका क्र. 513/2018, एडिटर्स फोरम विरूदध महाराष्ट्र शासन व इतर...**

**संदर्भ**:- 1) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. 18/10/2024 रोजी पारीत केलेले आदेश
2) म. शा. सामान्य प्रशासन विभाग शा. नि. क्र.न्यायाप्र-2018/प्र.क्र. 298/मावज-1, दि. 28/11/2024
3) मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. DTEM-D-16/41/2025-DESK16, दि. 04/02/2025

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, उक्त प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने समिती गठित करण्याबाबत व इतर निर्देश विचारात घेऊन संदर्भ क्र. 2 चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

मा. उच्च न्यायालयाने दि. 18/10/2024 च्या आदेशातील परिच्छेद क्र. 19 मध्ये दिलेल्या निर्देशानुसार दि. 20/12/2018 आणि 11/10/2024 च्या शासन निर्णयान्वये जाहिरातीबाबत दिलेल्या निर्देशाचे राज्य शासनांतर्गत सर्व मंत्रालयीन विभाग, शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था सार्वजनिक उपक्रम, शासकीय संघटना, शासनाच्या स्वायत्त संस्था, महामंडळे, मंडळे यांनी पालन करणे आवश्यक आहे.

या पत्राद्वारे आपणास सुचित करण्यात येते की, जाहिराती सबंधात कार्यवाही करतांना मा. सर्वोच्च न्यायालयाने जारी केलेल्या निर्देशाचे आणि मार्गदर्शक तत्वांचे पालन होईल यांची दक्षता घेण्यात यावी.

(मनोज म. अंधारे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती

प्रत:- 1) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई यांना माहिती करिता सविनय सादर. (कार्यासन क्र.16)
2) प्रोग्रा्मर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरिता.

1/87/197/2025

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६,
ई-मेल-desk१६@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक : DTEM-D१६/४१/२०२५-DESK१६ दिनांक:

प्रति,
सहसंचालक,
१) तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

विषय :- मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील याचिका क्र. ५१३/२०१८, एडिटर्स फोरम विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर ..

संदर्भ:-सामान्य प्रशासन विभागाचे क्र. न्यायप्र-२०१८/प्र.क्र.२९८/मावज-१, दिनांक ०२.१२.२०२४

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास असे कळविण्यात येते की, उक्त प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने समिती गठित करण्याबाबत व इतर निर्देश विचारात घेऊन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. न्यायप्र-२०१८/प्र.क्र.२९८/मावज-१, दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

मा. उच्च न्यायालयाने दिनांक १८.१०.२०२४ च्या आदेशातील परिच्छेद क्र. १९ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार उक्त संदर्भाधीन दि. २०.१२.२०१८ आणि दि.११.१०.२०२४ च्या शासन निर्णयान्वये जाहिरातीबाबत दिलेल्या निर्देशाचे राज्य शासनातंर्गत सर्व मंत्रालयीन विभाग, शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक उपक्रम, शासकीय संघटना, शासनाच्या स्वायत्त संस्था, महामंडळे, मंडळे यांनी पालन करणे आवश्यक आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने जाहिरातीसंबंधात जारी केलेल्या निर्देशाचे आणि मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्याबाबत आपल्या अधिनस्त सर्व शासकीय /अशासकीय संस्थांना दक्षता घेण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.

Signed by
Sunil Sukhadeo Bhamare
Date: 04-02-2025 19:06:14

(डॉ. सुनिल भामरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय म. रा., मुंबई.

सहसंचालक, तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय, अमरावती
जा. क्र. 854 ...दिनांक 18/02/2025

**शासनाच्या विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची लोककला व पथनाट्यांद्वारे जाहिराती व प्रसिध्दी करण्यासाठी लोककला संस्थांची यादी**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्र.मावज-२०१८/प्र.क्र.२३५/का.३४**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक:- २० डिसेंबर, २०१८**

**वाचा :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र.वृत्तचित्र-१८/लोककला यादी/का-७/८२९ दि.२०/११/२०१८

**प्रस्तावना :-**

शासनाच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वसाधारणत: वृत्तपत्रादी पारंपरिक माध्यमे आणि इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात असला तरीही लोककला आणि पथनाट्यांद्वारे शासनाच्या लोक कल्याणकारी योजना जनतेपर्यंत पोहोचवण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे अनेकवेळा स्पष्ट झाले आहे. त्यामुळे शासकीय योजना आणि योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांचे अनुभव हे जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी ग्रामीण भागात लोककला तर शहरी भागांमध्ये पथनाट्याचा वापर करुन शासनाच्या विविध योजनांची माहिती जनतेला देण्यासाठी लोककला आणि पथनाट्यांचा वापर करण्यासाठी संस्थांची यादी करणे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

शासनाच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वसाधारणत: वृत्तपत्रादी पारंपरिक माध्यमे आणि इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात असला तरीही लोककला आणि पथनाट्यांद्वारे शासनाच्या लोक कल्याणकारी योजना जनतेपर्यंत पोहोचवण्याचे प्रभावी माध्यम असल्यामुळे शासकीय योजना आणि योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांचे अनुभव हे जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी ग्रामीण भागात लोककला तर शहरी भागांमध्ये पथनाट्याचा वापर करुन शासनाच्या विविध योजनांची माहिती जनतेला देण्यासाठी लोककला आणि पथनाट्यांचा वापर करण्यासाठी संस्थांच्या यादीस शासन मान्यता देण्यात येत आहे. लोककला व पथनाट्य सादर करणाऱ्यांची जिल्हानिहाय यादी सोबतच्या परिशिष्टाप्रमाणे आहे.

२. त्यानुषंगाने लोककला आणि पथनाट्य सादर करणाऱ्या संस्थांच्या पथकाचे स्वरुप व सादरीकरणासाठी अटी व मानधन खालीलप्रमाणे आहे.

**पथकाचे स्वरुप व सादरीकरणासाठी अटी**

प्रत्येक पथकामध्ये १० कलावंत असतील. ज्यात स्त्री-पुरुष कलावंत, गायक-वादक (संगीत साहित्यासह) यांचा समावेश असावा. सादरीकरणाचा कालावधी किमान ३० मिनिटांचा असेल.

एखाद्या जिल्ह्यातील लोककला आणि पथनाट्य संस्थेचा यादीत समावेश नसल्यास नजीकच्या जिल्ह्यातील मात्र त्याच विभागातील संस्थेला काम देण्यात येईल.

- एका पथकाला एका दिवसात किमान दोन ते जास्तीत जास्त पाच कार्यक्रम देणे बंधकारक असेल.
- सादरीकरणाचा पुरावा म्हणून पथक प्रमुखाने जिल्हा माहिती कार्यालय अथवा जि.प. शाळा मुख्याध्यापक अथवा वर्ग एक वा वर्ग दोनचे अधिकारी अथवा संबंधित गावाचे सरपंच, ग्रामसेवक, तलाठी यापैकी एकाचे प्रमाणपत्र सादर करावे. त्याचबरोबर सादरीकरणाचे मोबाईल किंवा कॅमेऱ्यावरील व्हिडिओ चित्रीकरण, फोटो (जीपीएस स्क्रीनशॉट) सादर करणे आवश्यक आहे.
- कार्यक्रमाच्या सादरीकरणासाठी आवश्यक साहित्य (वाहन व्यवस्था, ध्वनीक्षेपण यंत्रणा, संगीत साहित्य, कलाकारांची वेशभूषा, बॅनर, कलाकारांना अल्पोपहार/भोजन इ.) पुरविण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

**मानधन**

- कार्यक्रम सादर करण्यात आल्याची पडताळणी केल्यानंतर प्रत्येक पथकाला प्रती कार्यकम रुपये ५,०००/- इतके मानधन देय असेल. सदर मानधनाचा धनादेश संस्थेच्या/पथक प्रमुखाच्या नावे काढण्यात येईल किंवा ईसीएसद्वारे संस्थेला अदा करण्यात येईल.
- लोककला व पथनाट्याकरिता संहिता लेखनाकरिता रु.२,०००/- इतके मानधन देण्यात येईल. (संहिता सक्षम अधिकारी/विषय तज्ज्ञ यांच्याकडून तपासून/मान्य करुन घ्यावी.)
- लोककला व पथनाट्य पथकांना तालीमीकरिता रु.१०,०००/- इतके शुल्क अदा करण्यात येईल. यामध्ये प्रवास खर्च, अल्पोपहार, भोजन, जागेचे भाडे इ. याचा समावेश असेल हे शुक्ल फक्त एकाच वेळेसाठी देण्यात येईल.

३. सदर यादी शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीकरिता अस्तित्वात राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संकेतांक २०१८१२२०१४५४१३३७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2018.12.20 16:01:28 +05'30'

**(रा. ना. मुसळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

Reply all | Delete Junk | ...

# मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील याचिका क्र. 513/2018, एडिटर्स फोरम विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर.

TANWEER ABDULRASHID ATTAR <tanweer.attar@mah.gov.in>
Today 12:55 PM
pstodcm@gmail.com; JAYSHREE BHOJ; Rajesh Kumar; Atul Patne; DR. RAJAGOPAL DEVARA ACS (C

Reply all |

Inbox

प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालय क्र. ९७०२२ दि. ०५/१२/२४

letter.pdf
443 KB

gr 28.11.2024.pdf
2 MB

Show all 2 attachments (2 MB) Download all

Respected Sir/Mam,

I have attached letter and government resolution dated on 28.11.2024. Please see.

३/१२

उ.स. (सम.)

555
०५/१२/२४

कक्ष (समन्वय)

सर्व संचालक यांना ई-मेल करावा.
श्री. देवकर

५-१२-२०२४

Scanned with OKEN Scanner

**शासनामार्फत दिल्या जाणा-या जाहिरातींमध्ये एकसूत्रीपणा येण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिकेवरील निकालात दिलेल्या मार्गदर्शकपर निर्देशांचे शासकीय जाहिराती प्रसिध्द करताना पालन करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : मावज-२०२३/८३४/प्र.क्र.३३५/का. मावज-१**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: ११ ऑक्टोबर, २०२४.

**संदर्भ :** १) मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्र. १३/२००३ मध्ये (याचिका क्र. १९७/२००४ व ३०२/२०१२ सह) (कॉमन कॉज वि. भारत सरकार) यामध्ये दि. १३.०५.२०१५ दिलेले आदेश.

२) रिट याचिका क्र. १३/२००३ (याचिका क्र. १९७/२००४ व ३०२/२०१२ सह) वरील पुनर्विलोकन याचिका क्र. १८९७/२०१५ मध्ये दि. १८.०३.२०१६ रोजी दिलेले आदेश.

३) महासंचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांचे परिपत्रक दि. ११.०८.२०१७

**परिपत्रक :**

मा. सर्वोच्च न्यायालयाने उक्त संदर्भ क्र. १ व २ येथे नमूद केलेल्या याचिकांमध्ये दिलेल्या आदेशानुसार सर्व राज्य शासकीय कार्यालये, (स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक उपक्रम, शासकीय संघटना, शासनाच्या स्वायत्त संस्था, महामंडळे, मंडळे इत्यादी यांनी शासकीय जाहिराती विविध माध्यमांद्वारे प्रसिध्द करतेवेळी अवलंब करावयाच्या मार्गदर्शक सूचना तथा निर्देश दिलेले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या उक्त संदर्भाधीन आदेशानुसार राज्य शासनाकडून विविध माध्यमांव्दारे सर्व प्रकारच्या जाहिरातींमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन वरील नमुद सर्व कार्यालयांनी करणे बंधनकारक आहे. सदरहू निर्देश महासंचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्या उक्त संदर्भ क्र. ३ येथील दि. ११.०८.२०१७ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व मंत्रालयीन विभाग, सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदा, महामंडळे/मंडळे/स्थानिक स्वराज्य संस्था/शासनाच्या स्वायत्त संस्था यांच्या निदर्शनास आणण्यात आलेले आहेत.

२. मा. राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक ३१.१०.२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे निर्देश दिले आहेत:-

**"शासनामार्फत दिल्या जाणा-या जाहिरातींमध्ये एकसूत्रीपणा येण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार जाहिरात प्रसिध्द करण्यासंबंधी सक्षम प्राधिकारी यांचे मान्यतेने धोरण निश्चित करण्यात यावे."**

उक्त परिच्छेदामध्ये नमूद मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्र. १३/२००३ मधील (याचिका क्र. १९७/२००४ व ३०२/२०१२ सह) (कॉमन कॉज वि. भारत सरकार) मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात नमूद केल्यानुसार शासकीय जाहिरातीमध्ये शासनातील

व्यक्तीश: पदाधिकारी अथवा राजकीय पक्ष यांना प्रोजेक्ट करण्यासाठी सार्वजनिक निधीचा गैरवापर होऊ नये याकरिता मा. सर्वोच्च न्यायालयाने एका समितीची स्थापना केली होती. या समितीने केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश मा. सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात संसदेद्वारे उचित कायदा करेपर्यंत सर्व शासकीय कार्यालये, शासकीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक उपक्रम, शासकीय संघटना, शासनाच्या स्वायत्त संस्था, महामंडळे, मंडळे इत्यादी यांना भारतीय संविधानाच्या कलम १४२ मधील तरतुदीनुसार दिलेले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाद्वारे गठीत समितीने विहित केलेल्या निर्देशांचे प्रिंट, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल इ. माध्यमांव्दारे शासकीय जाहिराती प्रसिध्द करताना काटेकोरपणे अनुपालन करणे उपरोक्त सर्व कार्यालयांना बंधनकारक आहे. सबब, मा. सर्वोच्च न्यायालयाद्वारे गठीत समितीने दिलेले मार्गदर्शक निर्देश हेच शासकीय जाहिराती प्रसिध्द करण्याबाबतचे धोरण असे समजण्यात येऊन त्याचे काटेकोरपणे पालन सर्व कार्यालयांनी करावे.

३. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त संदर्भाधीन क्र. १ व २ येथे नमूद आदेशानुसार यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाद्वारे गठीत समितीने शासकीय जाहिरातींच्या कंटेंट रेग्युलेशन (Content Regulation) बाबत दिलेल्या मार्गदर्शक तत्वांमधील "अनुपालन व अंमलबजावणी" (Compliance and Enforcement) या शीर्षाखाली मुद्दा क्र. (२) अन्वये दिलेल्या निर्देशानुसार सर्व संबंधित शासकीय विभाग व संस्थांचे प्रमुख हे या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे अनुपालन करण्यास जबाबदार राहतील तसेच त्यांनी माध्यमांमध्ये शासकीय जाहिराती प्रसिध्द करण्यापूर्वी मा. सर्वोच्च न्यायालयाव्दारे गठीत समितीने दिलेल्या निर्देशांचे संपूर्ण पालन केले असल्याबाबतचे त्यांच्या सहीचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.

**४.** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशातील वरील परिच्छेदात नमुद तरतुदीनुसार शासकीय जाहिरात प्रसिध्द करणाऱ्या संबंधित विभागाच्या प्रमुखांनी कोणतीही शासकीय जाहिरात प्रसिध्द करण्यापूर्वी त्यांच्या सहीचे प्रमाणपत्र माहिती व जनसंपर्क महासंचालनालयास उपलब्ध करून द्यावे.

**५.** सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१०१११३३०४३०९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SAMRIDHI VIJAYKUMAR ANGOLKAR

Digitally signed by SAMRIDHI VIJAYKUMAR ANGOLKAR DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, cn=SAMRIDHI VIJAYKUMAR ANGOLKAR Date: 2024.10.11 13:17:17 +05'30'

**( समृध्दी वि. अनगोळकर )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

सामान्य प्रशासन विभाग,
रुम नं.६१३, ६ वा मजला,
विस्तार इमारत, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दुरध्वनी क्र.०२२-२२८८१८९३

अतितात्काळ/ न्यायालयीन प्रकरण

क्र.न्यायप्र-२०१८/प्र.क्र.२९८/मावज-१ दिनांक :- ०२ डिसेंबर, २०२४

प्रति,
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव,
मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.

विषय :- मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील
याचिका क्र. ५१३/२०१८, एडिटर्स फोरम विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास, असे कळविण्यात येते की, उक्त प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने समिती गठित करण्याबाबत व इतर निर्देश विचारात घेऊन दि.२८ नोव्हेंबर,२०२४ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. उच्च न्यायालयाने दि. १८ ऑक्टोबर, २०२४ च्या आदेशातील परिच्छेद क्र. १९ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार उक्त संदर्भाधीन दि. २० डिसेंबर, २०१८ आणि ११ ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्णयान्वये जाहिरातीबाबत दिलेल्या निर्देशाचे राज्य शासनांतर्गत सर्व मंत्रालयीन विभाग, शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज संस्था, सार्वजनिक उपक्रम, शासकीय संघटना, शासनाच्या स्वायत्त संस्था, महामंडळे, मंडळे यांनी पालन करणे आवश्यक आहे. सदर निर्देश तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने जाहिरातीसंबंधात जारी केलेल्या निर्देशांचे आणि मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्याबाबत सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अखत्यारीतील संबंधित विभागांना/क्षेत्रीय कार्यालयांना दक्षता घेण्याबाबत सूचना सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार निर्गमित कराव्यात.

आपला,

( अ.घों. भोसले )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

सर्व माध्यमांवरील शासकीय जाहिरातींच्या नियमनासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार एक त्रिसदस्यीय समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र. न्यायप्र-२०१८/प्र.क्र.२१८/मावज-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- २८ नोव्हेंबर, २०२४.

वाचा :-
१) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. मावज-२०१८/प्र.क्र.१६७/३४, दि.०४ ऑगस्ट, २०१८.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. मावज-२०२३/८३४/ प्र.क्र.३३५/का.मावज-१, दि.११ ऑक्टोबर, २०२४.
३) मा. उच्च न्यायालय, मुंबई रिट याचिका क्र.५१३/२०१८, एडीटर्स फोरम विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर मध्ये मा. न्यायालयाने दि. १८/१०/२०२४ रोजी दिलेले आदेश.
४) संचालक (माहिती) (वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.जाहिरात (२०२४-२०२५) सा.प्र. वि./का-५/४६९, दि.२५ नोव्हेंबर, २०२४.

प्रस्तावना :-

राज्य शासनाची विविध कार्यालये / विभागांमार्फत प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये शासकीय जाहिरातींची प्रसिध्दी करतेवेळी, या संदर्भात अस्तित्वात असलेल्या शासन निर्णय / आदेशांचे पालन होत नसल्याची बाब एडीटर्स फोरम यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका क्र. ५१३/२०१८ दाखल करुन निदर्शनास आणली आहे. या याचिकेवर मा. उच्च न्यायालयाने दि. १८ ऑक्टोबर, २०२४ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयामध्ये यापूर्वी मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्र. (सिव्हील) १३/२००३, कॉमन कॉज विरुध्द भारत सरकार यामध्ये दिलेल्या निर्देशानुसार शासकीय जाहिराती विविध प्रकारच्या माध्यमांद्वारे प्रसिध्द करताना निर्माण होणाऱ्या तक्रारींचे वेळोवेळी निरसन करण्याकरीता तज्ञ जाणकारांची त्रिसदस्यीय समिती तात्काळ गठीत करण्याचे निर्देश राज्य शासनास दिले आहेत.

२. यापूर्वी मा. सर्वोच्च न्यायालयाने कॉमन कॉज विरुध्द भारत सरकार (याचिका (सिव्हील) क्र. ५१३/२०१८) या न्यायालयीन प्रकरणामध्ये दि. १३ मे, २०१५ रोजी दिलेल्या आदेशातील परिच्छेद क्र. ६ येथे नमुद केल्यानुसार या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाद्वारे गठीत केलेल्या समितीने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार या विभागाद्वारे उक्त संदर्भ क्र.१ येथील दि. ०४ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये तज्ञ जाणकारांची एक त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. दरम्यानच्या कालावधीत कोविडच्या परिस्थितीमुळे सदरची समिती नव्याने गठीत करण्यात आलेली नाही. तथापि, वरीलप्रमाणे नमूद केल्यानुसार मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशान्वये त्रिसदस्यीय समिती तातडीने नव्याने गठीत करण्याची बाब, तसेच या समितीचे अधिकार व कार्यकक्षा व समितीच्या सदस्यांचा कार्यकाळ नव्याने निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.५१३/२०१८, एडीटर्स फोरम विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर यामध्ये दि. १८ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या दिलेल्या आदेशानुसार कॉमन कॉज विरुध्द भारत सरकार, याचिका

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

(सिव्हील) क्र. १३/२००३ या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक निर्देशानुसार, शासनाचे विभाग व शासकीय कार्यालयांमार्फत तसेच, स्थानिक स्वराज संस्था, सार्वजनिक उपक्रम, शासकीय संघटना, शासनाच्या स्वायत्त संस्था, महामंडळे, मंडळे इ. या कार्यालयांमार्फत विविध माध्यमांद्वारे प्रसिध्द केल्या जाणा-या शासकीय जाहिरातींबाबत वेळोवेळी उद्भवणाऱ्या तक्रारींचे निरसन करण्यासाठी तसेच त्यांचे नियमन करण्यासाठी पुढे नमूद केल्याप्रमाणे या विषयातील तज्ञ जाणकारांची त्रिसदस्यीय समिती या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात येत आहे.

(अ) त्रिसदस्यीय समितीची रचना :-

| अ. क्र. | सदस्याचे नाव | संस्था/नियतकालीक | पद | पत्ता, दूरध्वनी/ Email |
|---|---|---|---|---|
| १. | प्रा. दैवता दिपक पाटील | पत्रकारिता आणि संज्ञापन विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई | सहायक प्राध्यापक | जी विंग, रुम नं.४, तळमजला, शासकीय वसाहत मुंबई, विद्यापीठ, कलीना सांताक्रुज (पूर्व) मुंबई-४०० ०९८, मोबाईल क्र. ९५१९५५५४४२ मेल आयडी- daivata.c@gmail.com |
| २. | डॉ. नरेंद्र वसंतराव बोरलेपवार | स्वरा मिडीया प्रा. लि., मुंबई | व्यवस्थापकीय संचालक | २२, २ रा मजला, मोहन टेरेस, ६४/७२, मोदी रस्ता, फोर्ट मुंबई-४०० ००१, मोबाईल क्र.९९६७३३०६२१ मेल आयडी- narendraborlepwar@gmail.com |
| ३. | श्री. आशुतोष शरद पाटील | जय महाराष्ट्र न्यूज चॅनल विनयभावे कॉम्पलेक्स, सी. एस. टी. रोड, कलीना, सांताक्रुज (पूर्व), मुंबई-४०० ०९८ | संपादक | A-९, मधूसुधन कॉ. ऑ. सोसायटी, देवनार बाग, मुंबई-४०० ०८८, मोबाईल क्र. ९९३०० ४३९९९ मेल आयडी- ashutoshspatil@gmail.com |

(ब) त्रिसदस्यीय समितीचे अधिकार व कार्यकक्षा :-

i) मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिका (सिव्हील) क्र. १३/२००३, कॉमन कॉज विरुध्द भारत सरकार या न्यायालयीन प्रकरणी दि. १३ मे, २०१५ रोजी दिलेल्या आदेशातील निर्देशानुसार, गठीत केलेल्या समितीने दिलेल्या मार्गदर्शक निर्देशांचे पालन होते किंवा कसे याची तपासणी करणे.

ii) राज्य शासनांतर्गत सर्व मंत्रालयीन विभाग, शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज संस्था, सार्वजनिक उपक्रम, शासकीय संघटना, शासनाच्या स्वायत्त संस्था, महामंडळे,



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

मंडळे यांनी प्रसिध्द केलेल्या सर्व प्रकारच्या माध्यमांवरील शासकीय जाहिराती सदर समितीच्या कार्यकक्षेत येतील.

iii) शासकीय जाहिराती विविध प्रकारच्या माध्यमांद्वारे प्रसिध्द करण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागामार्फत वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय जाहिरात धोरणविषयक सर्व नियमांचे/तरतुदींचे पालन होत आहे किंवा कसे हे पाहण्याची जबाबदारी समितीची राहील.

(क) <u>त्रिसदस्यीय समितीच्या सदस्यांचा कार्यकाळ</u> :-

या समितीच्या सदस्यांचा कार्यकाळ सुरुवातीस २ वर्ष इतका कालावधी राहील. यामध्ये आणखी एक वर्ष इतकी वाढ करता येईल. या समितीस दोनपेक्षा अधिक वेळा मुदतवाढ देता येणार नाही.

(ड) <u>समितीच्या सदस्यांना प्रवास खर्च व भत्ता</u> :-

या त्रिसदस्यीय समितीच्या बैठकांना उपस्थित राहणा-या सदस्यांना वित्त विभाग शासन निर्णय क्र.बैठक २०१२/प्र.क्र.१/सेवा-५, दि. २४ मे,२०१२ नुसार बैठक भत्ता तसेच, वित्त विभाग शासन निर्णय क्र. प्रवास २०१०/प्र.क्र.२/सेवा-५ दि. ३ मार्च, २०१० तसेच या संदर्भात वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार प्रवास खर्च व दैनिक प्रवास भत्ता देय राहील.

३. तसेच, मा. उच्च न्यायालयाने दि. १८ ऑक्टोबर, २०२४ च्या आदेशातील परिच्छेद क्र. १९ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार उक्त संदर्भाधीन दि. २० डिसेंबर, २०१८ आणि ११ ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्णयान्वये जाहिरातीबाबत दिलेल्या निर्देशाचे राज्य शासनांतर्गत सर्व मंत्रालयीन विभाग, शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज संस्था, सार्वजनिक उपक्रम, शासकीय संघटना, शासनाच्या स्वायत्त संस्था, महामंडळे, मंडळे यांनी पालन करावे. सदर निर्देश तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने जाहिरातीसंबंधात जारी केलेल्या निर्देशांचे आणि मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्याबाबत सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अखत्यारीतील संबंधित विभागांना/क्षेत्रीय कार्यालयांना दक्षता घेण्याबाबत सूचना निर्गमित कराव्यात.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४११२८१५५१२६०१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJAY DHONDBARAO BHOSALE

(अ.धों. भोसले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

६. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद .
८. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
११. मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१२. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
१४. महालेखापाल महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई
१५. महालेखापाल महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), नागपूर
१६. अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई
१८. सर्व संबंधित संस्था व समिती सदस्य
१९. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०. संचालक, (माहिती) (वृत्त व जनसंपर्क) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२१. संचालक, (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२२. सर्व विभागीय उपसंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई, कोकण, पुणे, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, लातूर, अमरावती, नागपूर
२३. सर्व जिल्हा माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
२४. उपसंचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, अ-८ स्टेट एम्पोरियम इमारत, बाबा खडकसिंग मार्ग, नवी दिल्ली- ११०००१
२५. वरिष्ठ सहाय्यक संचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, श्री.काकुले यांची इमारत, दादा वैद्य रोड, पणजी, गोवा.
२६. भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.कुटीर क्र.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२०
२७. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस(इं.) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०० ०२५
२८. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, ठाकरसी हाऊस, जे.एन.हेरेडिया मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई- ३८
२९. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०० ०२८.
३०. बहुजन समाज पक्ष, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य, बी.एस.जी.भवन, भूखंड क्र. ८३-ए, कलेक्टर कॉलनी, चेंबूर, मुंबई-४०० ०७४
३१. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र समिती, ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल मार्ग,मुंबई-०४
३२. भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पक्ष, महाराष्ट्र समिती, जनशक्ती सभागृह, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-४०० ०१३
३३. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई-४०० ०२८.
३४. निवड नस्ती मावज-१(का.३४), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

# IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
## ORDINARY ORIGINAL CIVIL JURISDICTION

## WRIT PETITION NO.513 OF 2018

Editors' Forum ...Petitioner

***Versus***

The State of Maharashtra & Ors. ...Respondents

---

Mr. S. B. Talekar a/w Ms. Madhavi Ayyappan, Mr. Chagan Thakare and Ms. Neha Lalsare for Petitioner.
Mr. Abhay Patki, Addl. G. P. for Respondent Nos.1 to 5, 7 to 11 and 14.
Ms. Heena Shaikh i/b. M. V. Kini for Respondent No.6-BEST.
Mr. Dhruti Kapadia a/w Ms. Anuja Tirmali for Respondent No.12-BMC.
Mr. B. B. Sharma for Respondent No.16-CIDCO.
Mr. Prashant Chawan, Senior Counsel a/w Ms. Poonam Sheth for Respondent No.17-MIDC.
Mr. Milind Bafna, Dy. Public Relations Officer, BMC present.
Mr. Rajendra Rane, Dy. Director from office of Director General of Information and Public Relations present.
Mr. Prakash Deshpande, Asst. Director from office DGIPR present.

---

**CORAM : M. S. SONAK & JITENDRA JAIN, JJ.**

**DATED : 18th OCTOBER 2024**

**P.C.:**

**1.** Heard learned counsel for the parties.

**2.** This petition is instituted by the Editors' Forum, complaining that the Government Resolutions (GRs) dated 1 May 2001, 13 August 2008, 31 August 2009, and 19 October 2015 issued by the General Administration Department of the State of Maharashtra regarding several issues concerning advertisements to be released to the print and electronic media are being flouted with impunity.

**3.** The petition provides several instances of the alleged breaches. There are complaints about violations of the rotation policy in distribution, the release of advertisements to non-approved newspapers and channels, the release of advertisements without involving the Director General of Information and Public Relations (DGIPR) regarding empanelment, non-approved creative agencies, etc.

**4.** The petition alleges several breaches not only by the State but also by agencies such as Bombay Municipal Corporation (BMC), City and Industrial Development Corporation (CIDCO), Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) and Maharashtra Industrial Development Corporation (MIDC) etc. The Petitioner seeks mandamus for scrupulous observance of the GRs issued by the Government on this vital subject. In addition, the petition seeks the Constitution of a Commission to enquire about the illegalities committed by DGIPR and other government agencies and local authorities. The petition also seeks departmental action and criminal prosecution against all those involved in breaching the GRs and frittering away public funds.

**5.** Mr. Talekar, learned counsel for the Petitioner, heavily relied on the decision of the Hon'ble Supreme Court in the case of ***Common Cause Vs. Union of India***[1] and ***Centre for Public Interest Litigation Vs. Kewal Kumar Sharma & Ors.***[2] to support his contentions.

**6.** During the hearing, we enquired from the learned Additional Government Pleader about the constitution of a three member body as was directed by the Hon'ble Supreme Court in the case of ***Common***

1 (2015) 7 SCC 1
2 (2017) 16 SCC 715

***Cause (supra)***. Mr. Patki, learned Additional Government Pleader placed before us the latest Government Resolution on the subject of advertisements by the State and its agencies dated 20 December 2018. Mr. Patki, learned Additional Government Pleader referred to the committee at clause 4.3.1 of the GR dated 20 December 2018 and tried to suggest that this would be the committee in terms of the decision of the Hon'ble Supreme Court in the case of ***Common Cause (supra)***.

**7.** Clause 4.3.1 of the GR dated 20 December 2018 refers to a committee of the following members: -

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Director General, Information and Public Relations | .. | Chairman |
| 2. | Director (Information) (Administration) | .. | Member |
| 3. | Director (Information) (Report) | .. | Member |
| 4. | Concerned Divisional Director/Deputy Director | .. | Co-opted Member |
| 5. | Deputy Director (Report) | .. | Member |
| 6. | Senior Assistant Director (Advertisement) | .. | Member |
| 7. | Superintendent, Books and Publications | .. | Member Secretary |

(officially translated copy)

**8.** 4.3.1 of the GR dated 20 December 2018 provides that the above committee is constituted to include and delete newspapers' names from the approved list. Accordingly, we are satisfied that the above committee has no nexus with the committee as contemplated by the Hon'ble Supreme Court in the case of ***Common Cause (supra)***.

**9.** In ***Common Cause (supra),*** the issue was about the utilisation of public funds for issuing advertisements by the Government and its instrumentalities through print and electronic media. One of the concerns which was addressed was the misuse of publicly funded

advertising campaigns through print and electronic media by the Government and its instrumentalities for furthering political motives of the political party in power by projecting political personalities and their political parties and proclaiming their achievements, as being malafide, arbitrary and violative of Articles 14 and 21 of the Constitution of India.

**10.** The Hon'ble Supreme Court issued several directions addressing the concerns expressed based upon the recommendations of a High Power Committee that was constituted for the purpose. One of the recommendations was the appointment of an Ombudsman to ensure that there is no abuse or misuse of public funds for issuing advertisements for extraneous purposes.

**11.** Paragraph No.29 of the ***Common Cause (supra)*** is relevant in the context of the Ombudsman / three-member body, and the same reads as follows:-

> *"29. Insofar as the recommendation with regard to the appointment of Ombudsman is concerned, we are of the view that for ironing out the creases that are bound to show from time to time in the implementation of the present directions and to oversee such implementation the Government should constitute a three-member body consisting of persons with unimpeachable neutrality and impartiality and who have excelled in their respective fields. We could have but we refrain from naming the specific persons and leave the said exercise to be performed by the Union Government."*

**12.** Since several directions issued by the Hon'ble Supreme Court in ***Common Cause (supra)*** were not complied with, the Centre for Public Interest Litigation and Common Cause instituted a Contempt Petition before the Hon'ble Supreme Court. The order dated 28 April 2016 was made in this contempt petition of the ***Centre for Public Interest Litigation (supra)***. In Paragraph No.6 of this order, the Hon'ble

Supreme Court has held that the spirit of the judgment of this Court dated 13 May 2015 (common cause judgment) would require States also to constitute their respective committees, which shall now be done. If the States so desire, the committee formed at the Central level referred to in the affidavit of Union of India may be entrusted with overseeing the publication of advertisements in the States. The Hon'ble Supreme Court held that this committee would be responsible for ironing out the creases that may show from time to time with the implementation of the directions of the Court and also for overseeing such implementation. Further, the Court clarified that if necessary, the committee cannot render effective and meaningful service for any reason, it is always open for an aggrieved party or a conscious citizen to approach Court once again.

**13.** Mr. Patki submitted that the State of Maharashtra constituted one committee in 2018. However, this committee is no longer functional after and due to the COVID-19 pandemic.

**14.** The complaints referred to in the petition could require investigations. If the committee directed by the Hon'ble Supreme Court were to be in place, we would have had no difficulties directing it to look into these instances of violations alleged in the petition.

**15.** There is no justification for not having a committee in the State of Maharashtra. The Hon'ble Supreme Court, in the case of ***Common Cause (supra)*** and ***Centre for Public Interest Litigation (supra),*** has issued directions for the constitution of a three-member body consisting of persons "*with unimpeachable neutrality and impartiality and who have excelled in their respective fields*". Accordingly, we direct the State Government to constitute such a three-

member body as expeditiously as possible and in any event before 14 December 2024.

**16.** We post this matter on 16 December 2024 to consider compliance. Once a three-member body consisting of persons with unimpeachable neutrality and impartiality and who have excelled in their respective fields is in place, we can consider referring the instances of violations to this committee.

**17.** The Chief Secretary, State of Maharashtra, shall personally ensure that such a three-member body is constituted. This is because a direction for the constitution of such a three-member body was issued on 13 May 2015 and reiterated on 28 April 2016. In compliance, as submitted by Mr. Patki, such a committee was constituted. However, from 2020 onwards, such a committee has been disbanded or has not been functional.

**18.** Article 144 of the Constitution of India provides that all authorities, civil and judicial, in the territory of India shall act in the aid of the Supreme Court. The State of Maharashtra, therefore, is duty-bound to constitute this three-member body as expeditiously as possible.

**19.** Besides, we also direct that the GRs dated 20 December 2018 and 11 October 2024, issued by the State of Maharashtra itself, should be complied with. In particular, the Chief Secretary, State of Maharashtra, must ensure that the State of Maharashtra releases no advertisements violating the directions and guidelines issued by the Hon'ble Supreme Court in the case of ***Common Cause (supra)***.

**20.** The BMC, CIDCO, MIDC, MHADA, BEST, and Municipal Corporation of Nagpur, who have been impleaded as Respondents in this petition, as well as the other Respondents in this petition, must ensure that no advertisements are released in violation of guidelines/directions issued by the Hon'ble Supreme Court in the case of ***Common Cause (supra)***.

**21.** If the petitioner encounters any violations between today and the next date, it is free to file an affidavit recording such instances. The petitioner and Additional Government Pleader are directed to send a copy of this order to the Chief Secretary of the State of Maharashtra at the earliest since this order places the onus of ensuring compliance upon the chief secretary.

**22.** List this matter on 16 December 2024.

**[JITENDRA JAIN, J.]** **[M. S. SONAK, J.]**

Signed by: Sayyed Saeed Ali
Designation: PA To Honourable Judge
Date: 22/10/2024 15:26:24